# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९

ई-मेल- jtdirrom@gmail.com website – www.jdteromumbai.com


**परिपत्रक**

क्र.२/विकामुं/तंशि/इबीसी/२०१३-१४/ 2893
दिनांक : 21 SEP 2013

प्रति,
प्राचार्य/संचालक
अशासकीय विनाअनुदानित अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/एचएमसीटी पदविका संस्था
अशासकीय, विनाअनुदानित अभियांत्रिकी/फार्मसी /एचएमसीटी /वास्तुशास्त्र पदवी महाविद्यालये
अशासकीय विनाअनुदानित एमबीए/एमसीए पदव्युत्तर पदवी महाविद्यालये

विषय :- व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०१३-१४ साठी शैक्षणिक शुल्काची प्रतिपुर्ती करण्याबाबत (ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरुन घेणेबाबत) ..........................

संदर्भ :- १. उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र.टिईएम २००६/(४२९/०७)/तांशि १, दि १०/डिसेंबर/२००७.
२. उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र.टिईएम - २०११(प्रक्र ५३/११)/तांशि ४, दि.८/नोव्हेंबर/२०११
३. आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के प्रतिपूर्तीच्या योजनेनुसार भरुन घ्यावयाचे अर्ज शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून ऑनलाईन पध्दतीने भरुन घेण्याबाबत दि. २७/०८/२०१३ रोजी आयोजित केलेली कार्यशाळा
४. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. १५/अर्थसं/ईबीसी/ऑनलाईन/२०१३/१०९, दि. २०/०९/२०१३

संदर्भीय क्र. १ अन्वये सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षापासून व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के शुल्क प्रतिपुर्तीची योजना राबविण्यात येत आहे. अर्ज स्विकारण्याची प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने सुरु करण्यांबाबत तंत्रशिक्षण संचालनालयाने संगणक प्रणाली विकसीत केली आहे. ह्या प्रणालीबाबत संस्थांना सविस्तर माहिती देण्याकरिता संदर्भीय क्र. ३ अन्वये दि. २७/०८/२०१३ रोजी कार्यशाळा आयोजित केली होती. ईबीसी सवलतीबाबतची माहिती ऑनलाईन भरण्याकरिता www.dte.org.in ह्या तंत्रशिक्षण संचालनालच्या वेबसाईटवर EBC Concession ची लिंक देण्यात आली आहे.

मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांच्या संदर्भीय क्र. ४च्या पत्रान्वये कळविण्यांत आले आहे की, उपरोक्त योजनेचे अर्ज संस्थांनी विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन संगणक प्रणालीवर उशिरात उशिरा **दि. ०३ ऑक्टोबर, २०१३** पर्यंत भरुन घ्यावेत. **याबाबत जाहीर प्रगटन/परिपत्रकाद्वारे संबंधित संस्थांनी सूचना फलकावर ठळक प्रसिध्दी द्यावी. तसेच सदरची सूचना वर्गामध्ये शिक्षकांमार्फत सर्व संबंधित विद्यार्थ्यांना द्यावी. संस्थेतील कोणताही विद्यार्थी सदर योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता संबंधित संस्थेच्या प्राचार्यांनी घ्यावी. विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहील्यास याची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुख/प्राचार्य यांची राहील.**

उपरोक्त योजनेसाठी विकसित केलेल्या संगणकीय प्रणालीच्या वापराच्या अनुषंगाने काही अडी/अडचणी असल्यास त्या बाबतचे निराकरण करण्यासाठी **श्रीमती व्ही.ए. चाटे**, सिस्टीम ॲनालिस्ट, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांची समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यांत आली आहे. त्याकरिता त्यांना systemanalyst.dte@gmail.com या ईमेल व दूरध्वनीवर क्र. ०२२/३०२३३४६८ वर संपर्क साधावा. तसेच या कार्यालयातील **श्री. के.बी. मानकर**, वरिष्ठ लिपिक यांचेशी jtdirrom@gmail.com वर संपर्क साधावा.

ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सदरचे प्रस्ताव **दि. १० ऑक्टोबर, २०१३ पर्यंत** या कार्यालयाकडे सादर करावेत.

**(जी. बी. धनोकार)**
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई.

प्रत - मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा. मुंबई यांना माहितीकरिता सादर.